नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd
अंक - ४७ | Issue - 47
वार गुरुवार दि. ३ जुलै २०२५ | Blow- Thursday Date 3 Jully 2025
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# गुन्हेगारांविरोधात जलद कारवाईसाठी नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक; कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी विभागीय कामाचे रँकीग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गुन्ह्यांच्या तपासात गतिमानता आणण्यासाठी नवीन फौजदारी कायदे उपयुक्त आहेत. या कायद्यांअंतर्गत डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर अपेक्षित असून न्याय प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक अधिसूचना व आदेश जारी करून कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच राज्यात नवीन फौजदारी संहिता कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभागनिहाय कामाचे रँकिंग करण्याच्या सूचनाही दिल्या.

विधानभवन येथे नवीन फौजदारी संहिता कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत आढावा घेताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीला गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नवीन फौजदारी संहिता कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. न्यायवैद्यक विभागाने गुन्हे सिध्दतेसाठी पुराव्यांच्या करण्यात येणाऱ्या चाचण्या वेळेत कराव्यात. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रिक्त पदे भरली असून आणखी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास मागणी करावी. सुविधा व नागरिक केंद्रित सेवा यामध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर आघाडीवर असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पोलिस दलाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातील पोलीस अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षणांचे नियमित अंतराने आयोजन करण्यात यावे. मास्टर ट्रेनर्स तयार करून न्यायालयीन अधिकारी, कारागृह कर्मचारी, फॉरेन्सिक वकिलांसाठीही प्रशिक्षण देण्यात यावे. ऑनलाईन 'एफआयआर' प्रणालीवर नागरिक सहजपणे तक्रार नोंदवू शकतील याबाबत काम करावे. ई साक्ष ॲप, सीसीटीएनएस प्रणाली याचा उपयोग वाढविण्यात यावा. गुन्हे सिद्धता वाढण्यासाठी ई न्यायालय प्रणाली सक्षम करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

महिलांसंदर्भातील गुन्ह्यांचा तपास जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी. विशेषतः छेडछाड व अत्याचाराच्या प्रकरणांचा तपास जलदगतीने पूर्ण करावा. आरोपपत्र लवकर दाखल करण्यासाठी कार्यवाही होणे गरजेचे आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. बैठकीस मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) राधिका रस्तोगी, प्रधान सचिव (कायदा व सुव्यवस्था) अनुप कुमार सिंह, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, महासंचालक (न्यायवैद्यक) संजय कुमार वर्मा, अपर पोलीस महासंचालक (कारागृह) सुहास वारके यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# फळपीक विमा योजनेस अर्ज करण्यासाठी चार दिवसांची मुदतवाढ

मुंबई : हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या मर्यादित कालावधीत केंद्र सरकारने मुदतवाढ देऊन राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य शासनाच्या योग्य समन्वयामुळे पिक विमा काढण्यासाठी शेतकऱ्यांना आता ६ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करता येणार असल्याचे कृषिमंत्री ॲड. कोकाटे यांनी सांगितले.

हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत मृग बहार २०२५ मध्ये द्राक्ष, पेरू, लिंबू, संत्रा, चिकू, मोसंबी या पिकांसाठी विमा योजनेत भाग घेण्यासाठी अंतिम दिनांक ३० जून २०२५ होती, मात्र २७ जून २०२५ पासून संकेतस्थळाबाबत समस्या असल्याने विमा अर्ज करण्यामध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी शेतकरी बांधवांकडून येत होत्या. याबाबत केंद्र सरकारशी योग्यवेळी समन्वय साधल्याने एकूणच परिस्थितीचा विचार करून दिनांक ३ ते ६ जुलै २०२५ असे एकूण चार दिवस वरील पिकांकरिता मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या‚.षिलू.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट देऊन विमा योजनेचा अर्ज करावा, असे आवाहन कृषिमंत्री ॲड. कोकाटे यांनी केले आहे.

# अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभाग मध्ये 'बाथरूम असून खोळंबा नसून अडचण'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/विशेष प्रतिनीधी

पंचायत समिती अक्कलकोट शिक्षण विभाग येथे तीन महिला कर्मचारी कार्यरत असून या ठिकाणी शासनाच्या वतीने कार्यालयात सुसज्जित असे स्वच्छतागृह बांधलेला आहे या स्वच्छतागृहाचे वापर गटशिक्षण अधिकारी अरबाळे यांनी कार्यालयीन दप्तर व कपाट ठेवण्यासाठी वापर करत आहे. शासनाचे नियमानुसार चालणारे गटशिक्षणाधिकारी यांनी सदर कार्यालयात कामकाज पाहणारे तीन महिला भगिनींना त्रास देण्याचा उद्देशाने बाथरूम मध्ये दप्तर व कपाट ठेवून सदर महिलांचे स्वच्छतागृहाचे वापरापासून वंचित ठेवले आहे का असा प्रश्न निर्माण होत आहे.

महिला कर्मचारी यांच्या विविध सुविधा देण्याबाबत शासनाचे अनेक जी आर निघाले आहे महिलेच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे असलेले शौचालय हे असून देखील त्याची गैर वापर होत असेल तर त्याबाबत

## 'स्वत:चे ठेवायचे झाकून दुसऱ्याचे बघायचे वाकून' अशी शिक्षणाधिकाऱ्याची गत


महिला आयोगाकडे गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांचे विरोध तक्रार दाखल करणार असल्याची माहिती फकिरा दलाचे जिल्हा अध्यक्ष ज्योतिबा पारखे यांनी सांगितले आहे येत्या आठ दिवसात शौचालय चालू न झाल्यास पंचायत समिती समोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यालयात कोणी जरी विचारले तर अशोबनीय भाषा वापरून त्यांना कार्यालयातून जाण्यास भाग पडतात. असे कित्येक चुका



करून सुद्धा प्रशासन त्यांना डोक्यावर घेत आहे. सदर प्रभारी गटशिक्षणाधिकारी काही चूक केली तरी शासन त्याकडे डोळे झाक करतात यामुळे संबंधित शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना त्रास होत आहे . कर्मचाऱ्यांना त्रास झाल्यावर सदर प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांना समाधान होत असेल असे त्यांचे कृत्यातून दिसून येत आहे.

गटशिक्षणाधिकारी यांच्या विरोधात अलीकडे अनेक तक्रारी वाढत असून एका महिलेने याबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केले असून त्याची चौकशी समिती स्थापन करून चौकशी चालू असताना तक्रारदार यांना अनेक माध्यमातून दबाव टाकून अर्ज मागे घेण्यासाठी प्रयत्न चालू आहे व शिक्षणाधिकारी यांच्या बाजूने जबाब देण्यासाठी कर्मचारी यांना दबाव टाकण्याचे प्रयत्न चालू आहे याबाबत चौकशी समिती निःपक्ष चौकशी करून महिलाना न्याय देतील का असा प्रश्न उपस्थित होत आहे.



पंचायत समिती येथे प्रत्येक विभागात स्वच्छतागृह त्याचे उपयोग बाकी सर्व विभागातील कर्मचारी करतात फक्त एकमेव शिक्षण विभाग जाणून बुजून बंद ठेवले आहे पंचायत समिती येथे पाण्याच्या सुविधा मुबलक असून सुद्धा स्वच्छतागृह कार्यालयात बंद ठेवले आहे. कार्यालयात स्वच्छतागृह बंद ठेवून बाकीचे शाळेतील स्वच्छतागृह चालू आहे की बंद आहे ही बघण्याचे अधिकार त्यांना कसं असतं थोडक्यात स्वत:चे ठेवायचं झाकून दुसऱ्याचे बघायचं वाकून असं शिक्षणाधिकाऱ्याचे गत झाले आहे प्रत्येक शाळेत जाऊन स्वच्छतागृहाची पाहणी करतात नसेल तर मुख्याध्यापकांना नोटीस देतात दुसऱ्यांना नोटीस देणारे अधिकारी स्वत:चा कार्यालयातील स्वच्छतागृह बंद का ठेवले.

> गेल्या अनेक महिन्यापासून मी शिक्षणाधिकारी यांच्या कामकाजाबद्दल माहिती घेतलेले असून त्यांनी अलीकडच्या काळात महिला कर्मचारी यांचे पिवळून करीत असल्याचे दिसून येतो यापूर्वी देखील वागदरी येथील मागासवर्गीय महिला शिक्षिका यांना त्रास दिलेले असून मागासवर्गीय शिक्षक यांना जाणीवपूर्वक त्रास देत असल्याचे दिसून येत आहे यात सुधारणा न झाल्यास मी अनुसूचित जाती आयोग व महिला आयोग यांच्याकडे लेखी तक्रार करणार आहे
>
> **– ज्योतिबा पारखे (जिल्हा अध्यक्ष फकिरा दल सोलापूर)**

## मनीषा कायंदे यांचा सभागृहात मोठा दावा

## सरकारने कारवाई करण्याची मागणी

# आषाढी वारीत शहरी नक्षलवादी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरात सध्या आषाढी वारीचा उत्साह आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरच्या दिशेला दिंड्या निघाल्या आहेत. संतांच्या मानाच्या पालख्या सोलापूर जिल्ह्यापर्यंत पोहोचल्या आहेत. लाखो वारकरी या वारीत सहभागी झाले आहेत. वारकरी टाळ-मृदुंगाच्या गजरात हरीनामात गुंग झाले आहेत. पण या वारीत शहरी नक्षलवाद्यांचा शिरकाव झाल्याचा गंभीर आरोप आमदार मनीषा कायंदे यांनी केला आहे. राज्य विधीमंडळाचं सध्या पावसाळी अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. या दरम्यान विधान परिषदेत शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे यांनी धक्कादायक दावा केला. वारीत अर्बन नक्षलवादी घुसल्याचा दावा मनीषा कायंदे यांनी केला आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवाय उंचावल्या आहेत. तसेच या प्रकरणात सरकारने कारवाई





करण्याची मागणी मनीषा कायंदे यांनी केली आहे.

अतिशय महत्त्वाची माहिती मी या ठिकाणी मांडत आहे. आपल्याला माहिती आहे की, जगप्रसिद्ध अशी पंढरपूरची वारी सुरु आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकऱ्यांचा समावेश असलेली पंढरपूरची आषाढी वारी सध्या सुरु आहे. गोरगरिबांचे देवस्थान असलेले, विठुरायांवर श्रद्धा असलेले, लाखो वारकरी या वारीत सहभागी होत असतात. या वैष्णवांच्या मेळाव्यात अनेक दिवसांपासून देवाला न मानणाऱ्या नास्तिक संघटनांचा शिरकाव झालेला आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. वेगवेगळ्या नावांखाली हे अरबान नक्षलवादी, जशी संविधान दिंडी पर्यावरण वारी या नावाखाली किंवा लोकायक या नावाखाली हे लोकांमध्ये ठिकठिकाणी वारीमध्ये जाऊन पथनाट्य करतात किंवा भाषणं देतात. लोकांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करतात, असा मोठा दावा मनीषा कायंदे यांनी केला.

महाराष्ट्र राज्य येत्या अधिवेशनात महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक आणणार आहे. हे विधेयक देखील या अशा गोष्टींना अटकाव करण्यासाठी आहे. हे गंभीर प्रकार आहे. मागेदेखील काही दिवसांपूर्वी काही लोकांनी वारीवर मटणाचे तुकडे टाकण्याचं काम केलं. तसंच हभप बंडातात्या कराडकर यांनीदेखील या सगळ्या विषयांवर खूप भाष्य केलेलं आहे. या सगळ्यांपासून त्यांनी सरकारला, मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलं आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. दोन दिवसांनी आषाढी एकादशी येत आहे. मला असं वाटतं शासनाने त्वरित यावर कारवाई करावी. हे सगळे प्रकार थांबले पाहिजेत. कारण लोकांचा बुद्धीभेद करणं, त्यांना देवापासून दूर करणं किंवा हिंदू धर्मावरच आक्रमण करण्याचे हे प्रकार सुरु आहेत. शासनाने यावर गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी आमदार मनीषा कायंदे यांनी सभागृहात केली.

# दर्शन रांग गोपाळपूरमध्ये, तरीही चक्क पाच तासात भाविक विठुरायाच्या चरणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : यंदा आषाढीमध्ये व्हीआयपी दर्शन बंद झाल्यानंतर मोठा चमत्कार दिसून आला. दर्शन रांग गोपाळपूरमध्ये असतानाही फक्त ५ तासांमध्ये भाविक थेट विठुरायाच्या चरणापाशी पोहोचू लागले आहेत. या याधी याच दर्शनासाठी १५ ते १६ तास लागायचे. आता केवळ पाच तासात विठ्ठलाचे दर्शन होत असल्याने भाविकातून समाधान व्यक्त केलं जात आहे.

खरंतर ही आषाढी यंदा विक्रमी होणार अशी परिस्थिती आहे. आषाढी एकादशी सोहळ्याला अजून चार दिवसांचा अवधी असतानाच देवाच्या दर्शन रांगेत दोन लाखापेक्षा जास्त भावी उभे आहेत. इतर वेळेला दर्शन रांग गोपाळपूरमध्ये असताना भाविकांना १५ ते १६ तास इतका वेळ दर्शनाला लागत असे. मात्र यंदा मात्र व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे भाविकांचा दर्शनाचा १५ तासाचा वेळ केवळ पाच ते सात तासांवर आला आहे.

व्हीआयपी बंदच्या दणक्याने अनेक व्हीआयपी नाराज जरी झाले असले तरी त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. यंदाच्या आषाढीमध्ये आमचे व्हीआयपी फक्त वारकरी असतील ही भूमिका पालकमंत्र्यांनी घेतली आणि स्वतःही मुखदर्शन घेत आपण केलेला नियम पाळण्यास सुरुवात केली. त्यामुळेच तथाकथित व्हीआयपी लोकांचे वांदे झाले असले तरी वारकरी भाविक मात्र खुशीत आहेत. १५ तासाचे दर्शन पाच तासात होऊ लागल्याने दर्शन रांगेवरील ताणही पूर्णपणे कमी झाला आहे. भाविकही आता अल्पावधीमध्ये देवाच्या चरणापर्यंत पोहोचू लागत असल्याने त्यांनाही हे दर्शन सुखकर होत आहे. यंदा आषाढी एकादशी यंदा ६ जुलै २०२५ रोजी आहे. त्यानिमित्ताने लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणार आहेत. गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा असे निर्देश शिंदे यांनी यावेळी त्याना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# मराठी माणूसः पराभूत विचार राजकारण कारणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मराठी माणसाचे हे वर्तन स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणातून कायम तसेच राहिले आहे असा आरोप नव्हे तर निष्कर्ष नोंदवता येतो. मराठी माणसाला शिक्षणातून लाभ भौतिक पातळीवर हवा आहे शिक्षणातून सुसंस्कृतता विचार विश्वाचे विकसित स्वरूप स्वतःला प्राप्त करून घ्यावे प्रश्नांच्या शोधात ज्ञान असते ज्ञानाच्या प्राप्तीत प्रश्नांची उकल असते हे मराठी माणसाच्या विच-ारात मनात वर्तनात निरंतर रुजले नाही. हे खरे वास्तव आहे मराठी माणसा-ची ज्ञान अभिवृत्ती ही थक्क करणारी अशी विकसित होत नाही.कारण इथे प्रतिकूलतेच्या विरुद्ध लढण्याचा दुर्दम्य इच्छाशक्तीचा अभाव आहे ही इच्छाशक्ती निर्माण होत नाही कारण इथे अध्यात्मिक लोकशाहीचे प्रबोधनाचे पीठ गावोगावी चालवले जाते. सगळ्या बैठका सगळ्या स्वाध्याय परिवाराच्या गर्दीत मराठी माणूस अध्यात्मचे नशा करतो. आणि पुन्हा तिथे मुक्ती आणि भोग याच्या वाटा शोधत राहतो. त्यामुळे त्याला ज्ञान तुच्छ वाटते. प्रश्नासाठी अविरत झपाटलेले वर्तन त्याला व्यर्थ आणि वेडे वाटते. प्रश्नच त्याला आ स्वस्त करत नाहीत. त्यामुळे संघर्षाची प्रेरणा रुजत नाही. त्याला प्रश्न का पडत नाहीत. प्रश्न कारने,समस्यांचा विचार करायचा असतो. व त्यातून कार्यकारण भाव शोधायचा असतो. कार्यकारण भावप्रत्येक गोष्टीतील शोधत असताना प्रश्नाच्या निर्मितीची कारणे जबाबदारी निश्चित करावयाची असते. आणि त्याचे संबंध आणि त्यासाठी प्रश्नांची साखळी ही स्वतःच विचाराच्या विश्वातून तयार करावयाची असते हे केले तरच कारणांच्या अंतिम शोधापर्यंत पोहचता येते. तर्काच्या आधारे पुढेजाता येते. असे हे प्रश्न सुद्धा आकलन अभाव मुळे समजत नाहीत. समाजाचा प्रश्नांचा वाढता गुंता हे आपल्या स्वतःच्या विचार आभावाचे वाढत गेलेले परिणाम असतात.

मोठ्या प्रमाणात इथे अध्यात्मच्या वाटेवरून चालणारा बहुसंख्यांक सम ाज निष्क्रिय वादाचा क्रिया विहीण वर्तनाचा स्वीकार करतो. आपोआप वाद आणि परिस्थितीला शरण जायला हवे असते. असे स्वतःच स्वतःची समजूत घालण्याची मानसिकता का निर्माण झाली हे तो शोधत नाही. हे जगभरच्या माणसाचे वर्तन जरी असले तरी पण मराठी माणसाच्या मनोविश्वात हा विकार मोठ्या प्रमाणात आढळून येतो. या कारणांची चर्चा करून नुसता उपयोग नाही. खरेतर यावर उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे.

लाभ प्राप्ती आणि तात्कालीक उपयोग करून घेणे इतका संकुचित व्यवहार करणारा असा हा मराठी माणूस प्रश्नांच्या जवळ थांबत नाही. वाटा पळवाता शोधतो.

तो प्रश्नांना आव्हान देत नाही. तो व्यवस्थेला सतत प्रश्न विचारत नाही. प्रश्नांच्या पासून दूर चालू लागण-ारा मराठी माणूस नेहमी पराभूत ग्रस्त मानसिकतेने चालत राहतो. तो विचार करत नाही विचार करणे महत्वाचे असते. यावर त्याची श्रद्धा नाही.

समस्येवर विचारातून मार्ग निघतो. यावर त्याचा अंतिमविश्वास नाही. विचार ही एक शक्ती आहे. विचार हा आत्म विश्वास विकासाचा मार्ग आहे.त्यातूनच व्यक्तीच्या प्रयत्नाची साधनेची शक्ती वाढते.हेही मराठी माणसाला जगण्याचे प्रधान सूत्र वाटत नाही.तो ते मान्य करीत नाही. त्याला दैवशरणता,अध्यात्म आणि हितसंबंधी त न्याती बांधवांच्या मदतीचा आधार वाटतो. हे मराठी म ाणसाचे असे भरकटलेलेस्वातंत्र्य उत्तर काळातील अविकसित विचाराचे वर्तन ही एक फार मोठी समस्या आहे. मराठी माणूस आधि मान्यतेच्या भुकेने उपाशी राहिलेला आढळून येतो. त्याला सतत वर्णादिष्ट जाती-धिष्ठित वरच्या वर्गांनी आपणाला अधि मान्यता द्यावी.अशी सारखी त्याला आशा लागलेली असते. त्याचीही ती भूक अंतिम जीवनाच्या प्रवासात भागत नसते,आणि ही भूक भागवण्यासाठी तो शरणतेच्या वाटे वरून नित्य चालत राहतो.त्याला प्रश्नांची आव्हान देण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती ही जीवनातली सामर्थ्य प्राप्ती आहे. असे अंतिमतः वाटत नाही. हे मराठी माणसाचे मोठे विचार अपयश आहे.

विचार अपयश असे म्हणत असताना. तो विचारच करत नाही. म्हणून अपयश येत राहते. हे वास्तव आहे. प्रश्नांचा विचार निरंतर करत राहणे. ही एक जीवनाची ज्ञानात्मक जगण्याची अभिवृत्ति शिक्षणातून आत्म सात करायची असते. त्यासाठी शिक्षण असते, शिक्षण आणि पैसा हे एक उद्दिष्ट पूर्णतः खरे नाही.

उदात्त, सभ्य आणि संवेदनशील माणूस शिक्षणातून आपण व्हायला हवे. तसा प्रयत्न स्वतःसाठी स्वतःच्या विचार विश्वाच्या विकासासाठी करायला हवा असतो. याचेही महत्त्व त्याला वाटत नाही. असे विचार स्वतःच्या व्यक्तिगत जीवनात त्याला सुचत नाहीत, याचे कारण त्याला दिले गेलेले शिक्षण होय. हे शिक्षण मर्यादित अर्थाने संकीर्ण आहे. त्याला दिले गेलेले शिक्षण हे जास्त अध्यात्मिक आहे. मराठी म ाणसाचा तर्क विकास, विचार विकास, संकल्पनात्मक ज्ञानाचा विकास, धर्म, तत्व व्यवहार साहित्य, संस्कृतीच्या विस्तीर्ण समीक्षेचा विकास, कला आणि जीवनाच्या अंतिम सत्याच्या शोधाचा विचार विकास हा सर्व कालखंडात इतिहासात व वर्तमानात ही जो काही झालेला आहे.परंतु तो सार्वत्रिक जनसम ुहांचा विचार विकास झालेला नाही.

मुठभर संख्येने अल्प असलेल्या वर्गाचा हा विकास हा व्यापक मराठी बांधवांचा विचार विकास ही नाही. महानगरीय जन व्यवहारात हे विचार विश्व थोड्या प्रमाणात आढळते. परंतु व्यापक मराठी माणसाच्या जीवन क्षेत्रात हे सर्व वर्तन विकसित होत नाही. त्यामुळे मराठी माणसाचा शिक्षण आणि ज्ञान, शिक्षण आणि संशोधन, शिक्षण आणि सृजन,शिक्षण आणि नव मानवतेची इहवादी संस्कृती ही ज्ञानातून विकसित करता येते. पारंपरिक नेणिवेचे दोष आपल्या विचार विकासातून नाहीसे करता येतात. विचाराचा विचार करता येतो. तो विचार अनेक प्रकारचा, प्रकारे करता येतो . करावयाचा असतो. विचाराच्या अनेकपद्धती असतात.

**क्रमशः**

**– शिवाजी राऊत, सातारा**

## संपादकीय....

# अंमलबजावणी व्हावी

गुन्ह्यांच्या तपासात गतिमानता आणण्यासाठी नवीन फौजदारी कायदे उपयुक्त आहेत. या कायद्यांअंतर्गत डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर अपेक्षित असून न्याय प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करत केंद्र सरकारच्या म ार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक अधिसूचना व आदेश जारी करून कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच राज्यात नवीन फौजदारी संहिता कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभागनिहाय कामाचे रँकिंग करण्याच्या सूचनाही दिल्या. विधानभवन येथे नवीन फौजदारी संहिता कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत नुकतीच आढावा बैठक घेण्यात आली. त्यात नवीन फौजदारी संहिता कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. न्यायवैद्यक विभागाने गुन्हे सिध्दतेसाठी पुराव्यांच्या करण्यात येणाऱ्या चाचण्या वेळेत कराव्यात. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रिक्त पदे भरली असून आणखी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास मागणी करावी. सुविधा व नागरिक केंद्रित सेवा यामध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर आघाडीवर आहे. पोलिस दलाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातील पोलीस अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षणांचे नियमित अंतराने आयोजन करण्यात यावे. मास्टर ट्रेनर्स तयार करून न्यायालयीन अधिकारी, कारागृह कर्मचारी, फॉरेन्सिक वकिलांसाठीही प्रशिक्षण देण्यात यावे. ऑनलाईन 'एफआयआर' प्रणालीवर नागरिक सहजपणे तक्रार नोंदवू शकतील याबाबत काम करावे. ई साक्ष ॲप, सीसीटीएनएस प्रणाली याचा उपयोग वाढविण्यात यावा. गुन्हे सिद्धता वाढण्यासाठी ई न्यायालय प्रणाली सक्षम करावी. महिलांसंदर्भातील गुन्ह्यांचा तपास जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी. विशेषतः छेडछाड व अत्याचाराच्या प्रकरणांचा तपास जलदगती-ने पूर्ण करावा. आरोपपत्र लवकर दाखल करण्यासाठी कार्यवाही होणे गरजेचे आहे.

# पत्रकार विनोद कथोरे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे/प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील शेरेकर पाडा येथे राहणारे पत्रकार विनोद कथोरे ( वय ४५) यांचं दुखत निधन झाले असून त्यांच्या पश्चात आई,पत्नी, २ मुले,१ म ुलगी असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने सर्वच ठिकाणाहून हळहळ व्यक्त केली जात आहे. पत्रकार विनोद कथोरे युट्युब चॅनलच्या माध्यमातून विविध विषयाला हात घालून आपल्या पत्रकारितेमधून अन्यायाला वाचा फोडण्याचे काम ते करीत होते. त्यांच्या अंत्यविधीसाठी विविध ठिकाणाहून नागरिकांनी गर्दी केली होती. शेरेकरपाडा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तर यावेळी विविध क्षेत्रातील नागरिकांच्या वतीने तसेच

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने आदरांजली व्यक्त करण्यात आली.

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेमध्ये शिवज्ञ भोईर याला सुवर्णपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भूटान येथे संपन्न झालेल्या दुसऱ्या साउथ एशियन आंतरराष्ट्रीय मर्दानी व कराटे चॅम्पियनशिप-२०२५ मध्ये म हाराष्ट्र मधील नाशिक रोड येथील युनिफाईट व मर्दानी स्पोर्टस अकॅडमी मधील विद्यार्थ्यांनी म र्दानी खेळ प्रकारात आपला सहभाग नोंदविला होता. यामध्ये शिवज्ञ भोईर, ओम मोरे, परीस गांगुर्डे, अथर्व भालेराव या खेळाडूंनी विरुद्ध संघाशी अतितटीचा सामना खेळत घवघवीत यश संपादन केले.

मर्दानी खेळ प्रकारात सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट सामना खेळत सुवर्णपदक प्राप्त करून आपल्या देशाचे आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव उंचविले आहे. यासाठी या खेळाडूंना वर्ल्ड चॅम्पियन महेंद्र (बाबा) साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. शिवज्ञ भोईसर याने आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेमध्ये




सुवर्णपदक मिळवल्याबद्दल सुरेंद्र बेंडकुळे, शैला भालेराव, लीला पगारे, प्रणाली पगारे यांनी सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आमदार बाबासाहेब देशमुख यांचा आदर्शवत निर्णय; दोन दिवस वारकरी बांधवांना देणार आरोग्यसेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सांगोला (तालुका प्रतिनिधी):आषाढी वारीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील लाखो वारकरी पायी चालत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाले आहेत.पायी वारीत वारक-यांचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशम ुख व डॉ.निकिता ताई देशमुख यांनी पुढाकार घेतला असून गुरुवार ३ जुलै व शुक्रवार दि. ४ जुलै रोजी वाखरी तालुका पंढरपूर येथे वारकऱ्यांसाठी आरोग्यसेवा देणार आहेत.

आषाढी वारी हीमहाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा गाभा आहे. वाखरी येथे पंढरीत जाण्यापूर्वी २५० किलोमीटर अंतर चालून थकलेल्या भाविकांची सेवा व वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.निकिता ताई बाबासाहेब देशमुख यांनी स्वतः दोन दिवस रात्रंदिवस वारकऱ्यांची सेवा करण्याचा निर्णय घेतला आहे.

याप्रसंगी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचेकडून वारकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांची माहितीही दिली जाणार आहे. खांद्यावर भगवी पताका आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन पंढरीची वाट चालणाऱ्या हजारो वारकऱ्यांना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.निकिता ताई देशमुख हे वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा देणार असल्याच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा रिंगण पूरंदावडे ता. माळशिरस









हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रेसाठी पंढरपूर नगरपालिका प्रशासन सज्ज

## मुख्याधिकारी महेश रोकडे; स्वच्छतेसाठी १५४२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी ०६ जूलै २०२५ रोजी होणार असून, आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून सुमारे १० ते १२ लाख भाविक येतात. येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.



आषाढी यात्रा कालावधीत शहरासह नदी पात्र, वाळवंट ,६५ एकर परिसर ,पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी जवळपास १५४२ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून यामध्ये नगरपरिषद पंढरपूर चे ३४८ कायम कर्मचारी तर जवळपास १००० हंगामी कर्मचारी तसेच जिल्ह्यातील इतर नगरपालिकेकडून जिल्हा प्रशासनामार्फत १९४ कर्मचारी स्वच्छतेसाठी नेमण्यात आले आहेत.

प्रशासनामार्फत पाणीपुरवठ्याच्या सर्व यंत्रणा सुस्थितीत असल्याची खात्री करण्यात आली आहे. आषाढी यात्रा कालावधीत महिलांच्या स्वच्छतेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरामध्ये वेगळ्या शौचालयांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच नदी पात्र, वाळवंट परिसर, वाखरी पालखी तळ, ६५ एकर व इतर विविध ठिकाणी हिरकणी कक्ष स्थापन करण्यात येत असून कक्षाच्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वेडींग मशिन बसविण्यात येणार आहेत. भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी शहरातील सार्वजनिक बोअरवेल, हातपंप आदी ठिकाणच्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे.तसेच दररोज पिण्याच्या पाण्याची क्लोरीन टेस्ट केली जाणार आहे.

शहरासह ६५ एकर, वाळवंट, पत्राशेड आदी ठिकाणी जंतनाशक फवारणीसह ,मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डम्पिंग ट्रॉल्या ,कॉम्पॅक्टर, कंटेनर, घंटागाडी, जेसीबी, जेटींग आदी वाहनांच्या माध्यमातून कचरा गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रा कालावधीत या घंटागाड्या सकाळी व रात्री अशा दोन वेळेस घरोघरीचा कचरा गोळा करतील. दररोज ५५ ते १२० टन इतका कचरा उचलण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रा काळात शहरातील व उपनगरातील सर्व मैदाने, नदी परिसर, ६५ एकर, पत्राशेड दर्शनबारी रोजचे रोज स्वच्छ व निर्जंतुक करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी रोकडे यांनी दिली

यात्रेकरुंच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासनाकडुन ६५ एकर, नदी पात्र, पत्राशेड, मंदिर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणी आपत्तीव्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे . त्याचबरोबर पत्राशेड, वाळवंट, ६५ एकर परिसर, रेल्वे मैदान या ठिकाणी तात्पुरते शौचालय उभारण्यात येणार आहेत. तात्पुरत्या शौचालयाच्या ठिकाणी पाण्याच्या टिपा ठेऊन त्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. वारकरी भाविकांनी उघड्यावर शौच विधी करू नये म्हणून प्रतिबंधक पथकांची नेमणूक देखील करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी रोकडे यांनी दिली.



सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील जीर्ण व धोकादायक इमारतींना नोटीसा देण्यात आल्या असून, शहरातील व वाळवंटातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. वाहनतळावरती दिशादर्शक फलक लावण्यात आले असून, आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात येणार आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यासह प्रदक्षिणा मार्ग, दर्शन बारी येथील लाईट दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच नदीपात्रात व घाटावर अखंडित व पुरेसा प्रकाश मिळावा यासाठी नदीपात्रात १३ हायमास्ट पॉइंट्स, घाटांवर २०० वॅटचे एलईडी दिवे चालू करण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक शौचालयातही लाईटची व्यवस्था करण्यात येत आहेत. शहरात वारीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे चौक, विसावा, भाई राऊळ चौक, कॉलेज चौक, संत गाडगे बाबा चौक, ६५ एकर इत्यादी ठिकाणी सौंदर्यीकरण कलाकृती उभारण्यात येत आहेत

यात्रा कालावधीमध्ये येणाऱ्या भाविकांनी शौचालयाचा वापर करावा, सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहनही मुख्याधिकारी श्री. रोकडे यांनी यावेळी केले आहे.

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या प्रयत्नातून १०८ रुग्णवाहिका चालक पूर्ववत कामावर रुजू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी यात्रा सोहळा कालावधीत राज्यातील १०८ च्या रुग्णवाहिकांच्या वाहनचालकांनी विविध मागण्यांसाठी अचानक संप पुकारला होता. यात्रा कालवधीत वारकरी -भाविकांना आवश्यक आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र राज्य बीव्हीजी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांच्याशी वाहनचालकांचा संप मिटवण्याच्या अनुषंगाने चर्चा केली. या चर्चेतून बीव्हीजी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संप मिटवण्याच्या बाबत सकारात्मक निर्णय घेतला आहे.

आषाढी वारी २०२५ पालखी सोहळ्यासोबत पायी चालत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी शासनाचा १०८ अत्यावश्यक वैद्यकीय सेवा विभाग व राज्य आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे वारीसाठी मोठ्या प्रमाणात आरोग्य सेवा उभारली आहे. यावर्षी सोहळ्यांसोबत तसेच पंढरपूर येथे १०० पेक्षा अधिक रुग्णवाहिका सज्ज करण्यात आल्या आहेत. काही रुग्णवाहिका कार्डियाक (हृदयविकार ग्रस्तांसाठी) सुविधा असलेल्या रुग्णवाहिकांचा यात समावेश आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या प्रयत्नातून रुग्णवाहिका चालकाचा संप मिटल्याने रुग्णवाहिकेच्या सेवा पूर्ववत सुरू झाल्या असून त्याचा रुग्णांना लाभ होत आहे.

# कळंब मध्ये पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा व ज्येष्ठ पत्रकारांचा गौरव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : पत्रकारांच्या कल्याणासाठी झगडत असलेल्या व्हॉइस ऑफ मीडिया कळंब तालुक्याच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा व ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. सत्कार समारंभात पत्रकारांच्या पाल्यांना एकुण ३० कीटचे वाटप करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संजय पाटील दुधगावकर जि प माजी अध्यक्ष धाराशिव, हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक संजय पवार पोलीस उपविभागीय अधिकारी कळंब, व नायब तहसीलदार भराडीया हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ.रश्मी मारवाडी महिला विंग प्रदेशाध्यक्ष, व्हॉइस ऑफ मीडिया, उमेश पोतदार कृषी विभाग कळंब, केतनजी कात्रे शैक्षणिक विंग महाराष्ट्र राज्य, अमर भाई चोंदे कार्यवाहक महाराष्ट्र राज्य, व अशोक शिंदे अध्यक्ष कळंब तालुका पत्रकार संघ प्रामुख्याने यांची उपस्थिती होती. त्यावेळेस जमलेल्या पत्रकार बांधवांना पोलीस उपविभागीय अधिकारी संजय पवार, संजय पाटील दुधगावकर माजी जि प अध्यक्ष, रश्मी मारवाडी महिला विंग प्रदेश अध्यक्ष, आणि चेतन कात्रे या सर्वांनी मार्गदर्शन केले, यावेळेस सौ.संगीता वनकळस यांची महिला विंग जिल्हाध्यक्ष धाराशिव पदी निवड करण्यात आली. या कार्यक्रमाला व्हॉइस ऑफ मीडियाचे सदस्य, पत्रकार बांधव, भगिनी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोशी महाराज मोहेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार, सुधाकर रणदिवे यांनी केले. हा कार्यक्रम पंचायत समिती सभागृह येथे घेण्यात आला होता.



# युवा-युवती सेनेच्या वतीने विद्यार्थी करिअर मेळावा, गुणवंताचा सन्मान उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : दि.३० जून २०२५ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे करियर मार्गदर्शन मेळावा आणि विद्यार्थी गुणवंत समारंभ उत्साहात संपन्न झाले. हा कार्यक्रम युवतीसेना व युवासेनेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी सर्व पालक आणि गुणवंत विद्यार्थी तसेच इतर शाळेतील आलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी १२.०० ते सायं ६.०० पर्यंत कार्यक्रम सुरू होता. अचीवर्स हॉल,पोलिस हेड क्वार्टर च्या समोर,सिविल चौक,सोलापूर या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पोरा अजून थोडं लढून बघ या प्रेरणादायी विषयावर प्राध्यापक विक्रमसिंह मगर सरांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर प्राध्यापक व्यवहारे सरांनी देखील विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. त्यांनी कार्यक्रम आयोजित केलेल्या समी मौलवी व प्रियंकाताई परांडे यांचेही विशेष कौतुक करून उपस्थित मुलींना त्यांचा आदर्श घेण्यास सांगितले. या कार्यक्रमास उपस्थित सर्व सन्माननीय व्यक्तींनी विद्यार्थ्यांच्या करियर संदर्भातील दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून - सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश नाना साठे,माढा लोकसभा संपर्क प्रमुख



संजय कोकाटे,म आ संपर्क प्रमुख अनिताताई माळगे,जिल्हाप्रमुख- अमोल बापू शिंदे,अमरजी पाटील,कार्यकारणी सदस्य सुजित खुर्द, प्रियदर्शन साठे,गणेश जाधव,महादेव भोसले,गौतमी लोंढे,स्नेहा चवरे,कृष्णाताई बिराजदार,नामदेव पवार,आशिष जेठीथोड इ. उपस्थित होते.

# माळी समाजाच्या वतीने ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांचा आज सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा संपर्क मंत्री ना. जयकुमार गोरे भाऊ हे पुढील आठवड्यात धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. तेव्हा जिल्ह्यातील सकल माळी समाजाच्या वतीने त्यांचा धाराशिव शहरात भव्य सत्कार करण्यात येणार आहे. यासाठी विश्वनाथ अण्णा तोडकर यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन मिटिंग आयोजित करण्यात आली.त्या साठीचे नियोजन करण्यासंदर्भात धाराशिव येथे दि. ३ जुलै गुरुवारी सायंकाळी ठीक ४ वाजता विश्राम गृहावर समाज बांधवांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.सदर बैठकीस समाज बांधवानी उपस्थित राहावे असे आवाहन सर्व श्री, गौतम क्षीरसागर, उमाकांत गोरे, अविनाश माळी, बाप्पा कोरे, मनोज माळी, संतोष चौघुले, तानाजी माळी, बाळासाहेब वाडकर,दिलीप मेहत्रे, बालाजी गोरे, प्रदीप माळी,अमर गोरे, महादेव माळी, सौदागर गोरे, दत्ता माळी, महेश माळी, सचिन खडबडे या उपस्थित समाज बांधवानी केले आहे.



आमदार अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नाला यश

तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

# सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी उजनी धरणातून पाण्याचे आवर्तन सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

माढा तालुक्यातील सर्व पाझर तलाव भरून घेण्यासाठी सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून आज सकाळी पाण्याचे पूजन करून सोडण्यात आले. आमदार पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे शक्य झाले असून या निर्णयामुळे माढा तालुक्यातील शेतीला मोठा दिलासा मिळणार असून आगामी हंगामात कृषी उत्पादनात मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे.



माढा तालुक्यातील सर्व पाझर तलाव भरण्यासाठी सतत अधिकाऱ्यांसोबत बैठक व चर्चा करून आज पाणी सोडण्यात आले असून शेतकऱ्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. टेल टू हेड पाणीपुरवठा पुर्ण होईल. असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य भारतआबा शिंदे, जेष्ठ नेते, भारतनाना पाटील, युवक जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, युवती जिल्हाध्यक्ष विनंती कुलकर्णी, डिव्हीपी बँकेचे चेअरमन औदुंबर महाडिक, रामकृष्ण काळे, सुरेश पाटील, बाळासाहेब ढेकणे, हरिभाऊ माने, आकाश पाटील, दिपक खोचरे, धाराशिव साखर कारखान्याचे संचालक संदीप खारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गेले कित्येक वर्ष या योजनेसाठी शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून रणजीत शिंदे यांनी पैसे घेतले ८१टक्के हे शासनाने व १९टक्के हे शेतकऱ्यांनी भरायचे असताना देखील शेतकऱ्यांकडून पूर्णपणे पैसे वसुली करण्यात आली त्या पैशाचा हिशोब रणजित शिंदे यांनी द्यावा तसेच काल परवा ज्यांनी आमदारांवर टीका केली त्यांची कुवत त्यांनी स्वतः तपासून घ्यावी या शब्दात जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे यांनी खोचक टीका केली.

**- जि.प.सदस्य, भारत शिंदे**

# उद्या श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, श्री क्षेत्र आळंदी-देहू-पंढरपूर परिसर विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि.४ जुलै २०२५ रोजी दुपारी १.३० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत 'श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा पंढरपूर, वाखरी येथील पालखी तळाच्या शेजारी विश्वशांती गुरुकुल परिसरात होणार आहे. वारकर्यांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड व वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे यांनी केले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन माजी गृहमंत्री व राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. श्री. सुशीलकुमार शिंदे व राज्य विधानसभेचे माजी सभापती मा. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. तसेच हिंद केसरी दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर व आमदार समाधान आवताडे हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.

आयोजित स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वारकरी मल्लांनी ४ जुलै २०२५ रोजी सकाळी ७.३० ते ११.३० वा. विश्वशांती गुरूकुलच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ आपली नावे नोंदणी करावी. सोबत वयाचा पुरावा म्हणून आपले आधार कार्ड किंवा शासनमान्य ओळखपत्र ठेवावे. अधिक माहितीसाठी श्री. विलास कथुरे मो. नं. ९८५०२११४०४ व डॉ.वैभव वाघ मो.नं. ८८८८११८४०० यांच्याशी संपर्क साधावा.

विशेष आकर्षण म्हणजे योगमहर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृति प्रित्यर्थ तंदुरूस्त अशा सत्तर (७०) वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी आगळी वेगळी कुस्ती स्पर्धा होईल. १६ ते २५ वयोगटातील विजेत्यास 'कुमार वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार, ५६ ते ६५ वयोगटातील विजेत्यास 'वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येईल. तसेच थोर स्वातंत्र्यसेनानी, योगमहर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तंदुरूस्त अशा ७० वर्षांच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी एक आगळी वेगळी विशेष कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेतील विजेत्यास 'ज्येष्ठ वारकरी कुस्ती महावीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. विजेत्या कुस्ती महावीरांचा सन्मान-मानाचा फेटा, माऊलींची/जगद्गुरुंची प्रतिमा, शाल, स्मृतिचिन्ह, सुवर्ण/रौप्य/कांस्य पदक व रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरव करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील या लोककलेला परत संजीवनी मिळावी म्हणून याच दिवशी रात्री ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत, वारकर्यांना अत्यंत प्रिय असलेल्या शांती ब्रह्म संत एकनाथ महाराजांचे प्रसिध्द असलेले नाथांचे भारूड व गवळणी ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी ८ हजार ११७ पोलिसांची यंत्रणा सज्ज

## उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले; ९ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र, १० ठिकाणी होडी नियंत्रक पथकाची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी ०६ जुलै २०२५ रोजी असून, या आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पो-लीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.

आषाढी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी ८ हजार ११७ पो-लीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, चार अप्पर पोलीस अधिक्षक, २४ पोलीस उपअधिक्षक, ७६ पोलीस निरिक्षिक, ३१२ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ४ हजार ८५० पोलीस अंमलदार व २ हजार ८५० होमगार्ड तसेच ०५ एसआ-रपीएफ कंपनी, ७ बीडीएस पथके, आरसीपी दोन पथके, क्युआरटी चार पथके, आपत्कालिन परिस्थिती हातळण्यासाठी प्रशिक्षित १४ कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आ-हेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने १० ठिकाणी पथके स्थापन करण्यात आली आहेत.



वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १२ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पो-लीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच सुमारे ३०० सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी ठिकाणी तीर्थक्षेत्र पो-लीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

### आपतकालिन परिस्थिती हातळण्यासाठी १४ प्रशिक्षित कार्ट पथके

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे . तसेच वाहतुक नियमनासाठी १४ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पो-लीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.भोसले यांनी केले आहे.

---

## थोडक्यात...

### माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांचा सोलापूर जिल्हा दौरा



सोलापूर (जिमाका) : राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड . आशिष शेलार हे दि.०४ व ०५ जुलै २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

शुक्रवार दि.०४ जुलै २०२५ रोजी दुपारी ०१.०० ते ०१.३० वा. पिराची कोरोली ता. पंढरपुर येथे आगमन व जगतगुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी दर्शन. दु.१.३० ते २.३० वा. जगतगुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखीत पावनधाम दिंडी क्र.१२० च्या रथा मागे वारकऱ्यांसमवेत पायी चालणे. दु.२.३० वा. भंडीशेगाव कडे रवाना. दु.२.४५ ते ३.४५ वा. भंडीशेगाव येथे आगमन व ह.भ.प. श्री वासकर महाराज यांच्या दिंडी मध्ये सहभागी होऊन पायी चालणे. दु.३.४५ वा वारकऱ्यांसमवेत अल्पोपहार . सायं.०४.०० वा. बाजीराव विहिर येथे आगमन व रिंगणसोहळ्यास उपस्थिती .सायं.०५.०० वा ज्ञानेश्वर माऊली पालखी दर्शन व राखीव. सायं. ०६.३० वा. पंढरपूर अतिथिगृहा कडे प्रयाण. सायं.०७.०० वा. पंढरपूर अतिथिगृह येथे आगमन व राखीव. सायं.०७.३० वा श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरा कडे रवाना. रात्री.०८ ते ८.३० वा. श्री विठ्ठल रूक्मिणी दर्शन व राखीव. रात्री ८.४५ वा.पंढरपूर अतिथीगृह येथे आगमन व राखीव .रात्री ०९ वा. श्री प्रशांत परिचारक मा.वि.प.स. यांच्या निवासस्थानी भोजन व राखीव. रात्री १० वा. अतिथीगृह येथे आगमन व राखीव.

शनिवार दि.०५ जुलै २०२५ रोजी सकाळी ०८ वा. पंढरपूर अतिथीगृह येथे राखीव. सकाळी १० वा. पंढरपूर येथून इसबावी ता. पंढरपूर कडे मोटारीने प्रयाण. सकाळी १०.३० वा. इसबावी ता. पंढरपूर येथे आगमन व राखीव. दु. १२ ते ०१.३० वा. सांस्कृतिक कार्य संचालनालयाव्दारे उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर विविध पालख्यांचे स्वागत करणे. व दुपारी ०१.३० वा इसबावी येथून मोटारीने मुंबई कडे प्रयाण करतील.

---

# डुबेरे विद्यालयात शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय मंत्रिमंडळाची निवड लोकशाही पद्धतीने करण्यात आली.

मंत्रीमंडळाच्या निवडणुकीचे नियोजन विद्यालयाचे पर्यवेक्षक उल्हास पवार यांनी केले. शालेय विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया माहिती व्हावी या उद्देशाने निवडणूक कार्यक्रम,उमेदवारांनी फॉर्म भरणे, माघार घेणे, चिन्ह वाटप करणे,शालेय आवारात प्रचार करणे इत्यादी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन चिठ्ठीद्वारे मतदान घेण्यात आले. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतमोजणी करून ज्या उमेदवाराला जास्त मतदान मिळाले त्याला विजयी घोषित करण्यात आले. याप्रमाणे शालेय मंत्रिमंडळातील पंतप्रधान, उपपंतप्रधान व मंत्रिमंडळातील इतर सदस्यांची निवड करण्यात आली.ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जेष्ठ शिक्षक सोमनाथ पगार,डी.ए.रबडे,रेवणनाथ कांगणे,क्रीडाशिक्षक शिवाजी गुरुळे यांनी परिश्रम घेतले.

निवडून आलेल्या मंत्र्यांचा सत्कार विद्यालयात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते.

व्यासपीठावर पर्यवेक्षक उल्हास पवार, सुनिल ससाणे, विद्या ठाकरे, रेखा खंडीझोड, सिमा गोसावी, कचेश्वर शिंदे, कल्पना शिंदे, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शालेय नियमांच्या अधीन राहून आपले काम निष्ठा व प्रामाणिकपणे पूर्ण करण्याचा संकल्प याप्रसंगी विद्यार्थ्यांनी घेतला .शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी पदाचा सुयोग्य वापर करून शाळेची शिस्त गुणवत्ता व पारदर्शकता अबाधित ठेवण्याचा संकल्प देखील विद्यार्थ्यांनी केला. मुख्याध्यापक उगले यांनी निवडणुकीत सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून विजयी उमेदवारांना शुभेच्छा दिल्या. तसेच शालेय मंत्रिमंडळातील सदस्यांनी शालेय शिस्त, गुणवत्ता वाढीसाठी स्वतः कार्य तत्पर राहावे व शाळेच्या नावलौकिकात भर मिळविण्यासाठी प्रयत्न करावे असे आव्हान मुख्याध्यापक उगले यांनी केले.उपशिक्षक सोमनाथ गिरी यांनी विद्यार्थ्यांना मंत्रिमंडळाचे कार्य सांगून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आभार प्रदर्शन उपशिक्षिका जयश्री गोहाड यांनी केले.

**शालेय मंत्रिमंडळ पुढील प्रमाणे**

पंतप्रधान -प्रथमेश गणेश वाजे ,उपपंतप्रधान/ श्रावणी राजेंद्र माळी ,शालेय प्रतिनिधी -आदेश दत्तात्रय वाजे,

अर्थमंत्री- स्वरांजली नवनाथ सहाणे, स्वच्छता मंत्री- तन्वी कैलास कुटे, सांस्कृतिक मंत्री- धनश्री संपत माळी , सहलमंत्री - परिणीती अशोक टोचे, अभ्यास मंत्री-मानसी राजेंद्र वारुंगसे, क्रीडामंत्री/आरोग्य मंत्री- ईश्वर संदीप पडवळ. शालेय मंत्रिमंडळाचे अभिनंदन शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने ,शालेय समितीचे सर्व सदस्य, पालक -शिक्षक व माता-पालक संघ सदस्य आदींनी केले आहे. यावेळी शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.




---

# सेवानिवृत्त झाल्याबद्दल मोहन चव्हाण यांचा विविध संघटनेच्या वतीने सन्मान



पुरंदर/प्रतिनिधी : डॉ विनायक गायकवाड

सासवड नगरपरिषद कार्यालयात गेले ३० वर्ष सेवा करुन सासवड नगरपरिषद आरोग्य अधिकारी म्हणून सेवानिवृत्त होत असल्याने मोहन चव्हाण यांचा विविध पक्ष संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला,

यावेळी रिपाइंचे विष्णूदादा भोस-ले, बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिलतात्या धिवार, पुरंदर सहकारी पतसंस्थेचे संचालक आनंदराव घोरपडे गुरुजी, सासवड नगरपरिषदेचे बांधकाम समितीचे माजी सभापती सोपानराव रणपिसे, रिपब्लिकन पक्षा-चे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे, सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी सुनील जगताप, बहुजन हक्क परिषदेचे सचिव कैलास धिवार, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पुरंदर तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे, रिपब्लिकन पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सचिन कांबळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते,

३० वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर मोहन चव्हाण हे सोमवार दि. ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त होत असताना त्यांचा सेवापूर्ती निमित्त नगरपरिषद कार्यालयात सत्कार करण्यात आला,

मोहन चव्हाण यांनी अत्यंत सेवाभावी वृत्तीने सासवड नगरपरिषद येथे काम करीत असताना सर्व नागरीकांच्या समस्येला प्राधान्य देऊन आपला कार्यकाल पूर्ण केला आहे, त्यांच्या विभागाच्या व्यतिरीक्त इतर विभागातील नागरीकांचे प्रश्न तक्रारी सोडविण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केल्याने एक जबाबदार व कृतीशील अधिकारी म्हणून त्यांनी सासवड शहरात स्वतः हाची ओळख निर्माण केली होती, त्यामुळे त्यांच्या कार्यशैलीचे सर्वत्र कौतुक होत आहे,

---

# शालेय शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांना वर्षभरात १२८ सुट्याची मेजवानी

निफाड/ प्रतिनिधी : शालेय शिक्षण विभागाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी शाळांसाठीच्या सुट्यांची अधिकृत यादी जाहीर केली. यानुसार ५२ रविवार वगळता वर्षभरात विविध सण, उत्सवाच्या ७६ अशा एकूण १२८ दिवस सुट्या मिळणार आहेत. यामध्ये दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्यांचाही समावेश आहे.

शिक्षण विभागाने यंदा वेळापत्रक आणि सुट्यांमध्ये स्पष्टता आणत शाळा व्यवस्थापनाला वेळेचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार दिवाळी सुटी १६ ते २७ ऑक्टोबर या कालावधित १० दिवसांची, तर उन्हाळी सुटी २ मे ते १३ जूनदरम्यान ३८ दिवसांची असणार आहे. याशिवाय विविध सण, उत्सव आणि धार्मिक पर्वांनुसार महिनानिहाय सुट्यांची योजना करण्यात आली. जुलै ते एप्रिलपर्यंतचे सुटीचे नियोजन करण्यात आले. यात सर्वच प्रमुख सणांचा समावेश करण्यात आला; तसेच स्थानिक स्तरावर सण साजरे होण्याच्या तारखा वेगळ्या असल्यास आवश्यक त्या सुधारणा गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतरच करता येतील, हेही स्पष्ट केले. शाळांना सलग तीन दिवस सुटी ठेवण्यास शासनाने बंधने घातली आहे. गावातील यात्रा किंवा स्थानिक सण यांसारख्या खास प्रसंगांशिवाय सलग तीन दिवस शाळा बंद ठेवू नयेत, असा स्पष्ट आदेश शिक्षण विभागाने दिला. सुटी घेण्यापूर्वी मुख्याध्यापकांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसह गटशिक्षणाधिकाऱ्यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक असणार आहे. मुख्याध्यापकांनी स्वतःच्या अधिकारात सुटी घेतल्यास ती किमान तीन दिवस आधी लेखी स्वरूपात कळविणेही अनिवार्य असेल.

■ जुलै - आषाढी एकादशी, मोहरम, नागपंचमी- २ दिवस

■ ऑगस्ट - रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन, गणेश चतुर्थी ३ दिवस

■ सप्टेंबर - गौरी विसर्जन, ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्वशी, घटस्थापना: ४ दिवस

■ ऑक्टोबर - गांधी जयंती व दसरा, दिवाळी सुटी ११ दिवस

■ नोव्हेंबर - गुरुनानक जयंती : १ दिवस

■ डिसेंबर - ख्रिसमस: १ दिवस

■ जानेवारी- मकरसंक्रांती, शबे-ए-मेराज, प्रजासत्ताक दिन- ३ दिवस

■ फेब्रुवारी- शबे-ए-बरात, महाशिवरात्र, शिवजयंती ३ दिवस ■ मार्च - होळी, रंगपंचमी, गुढी पाडवा, रमजान ईद, रामनवमी, महावीर जयंती, शब-ए-कदरः ६ दिवस ■ एप्रिल - गुड फ्रायडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती: २ दिवस ■ मे - जून: महाराष्ट्र दिन व उन्हाळी सुट्टी -३९ दिवस जिल्हाधिकारी / मुख्याध्यापक अधिकारातील विशेष सुट्या -२ दिवस

---

### श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शन पाच तासात झाल्याने भाविकांकडून जिल्हाधिकाऱ्यांचे आभार

### भाविकांना देण्यात आलेल्या सुविधा खूप उत्कृष्ट असल्याचे कौतुक

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली दर्शन रांग व पत्राशेडची पाहणी; भाविकांशी साधला संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (जिमाका) : आषाढी शुद्ध एकादशी ६ जुलै २०२५ रोजी असून, श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांनी पंढरपुरात मोठी गर्दी केली आहे. आज सकाळ पासूनच दर्शन रांग जवळपास गोपाळपूर जवळ पो-होचली आहे. भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर श्री विठ्ठल रूक्मिणीचे व्हिआयपी दर्शनाबाबत आपत्ती व्यवस्थापन कायद्यातंर्गत तसेच राज्य शासनाच्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आदेश दिले आहेत. सदर आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का नाही याची पाहणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज दर्शन रांग व पत्राशेड येथे केली. तसेच दर्शन रांगेतील भाविकांशी यावेळी संवाद साधला.

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी किमान १५ ते १६ तास यापूर्वी लागत होते तर यावर्षी फक्त पाच ते सहा तासात आपले दर्शन झालेले आहे. तसेच मंदिर परिसर व संपूर्ण पंढरपूर शहरात भाविक वारकरी यांच्यासाठी खूप चांगल्या सुविधा दिलेल्या आहेत, याबद्दल त्या



भाविकांने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे मोठ्या उत्साहाने व आनंदाने आभार व्यक्त केले. हे भाविक व त्यांच्या समवेत असलेले इतर भाविक हे खूप कमी वेळात दर्शन झाल्याबद्दल आनंदी व समाधानी होते. यावेळी त्यांच्यासमवेत मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते.

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणावर भावीक येत आहेत. शासनाने जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून वारकरी भाविकांसाठी पालखी मार्ग व पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणावर सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या सर्व सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पंढरपूर शहरात विविध ठिकाणी भेटी देऊन घेत असताना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या परिसरात इंडियन एअर फोर्स मध्ये पंधरा वर्षे सेवा बजावलेले व पंढरपूर येथे अनेक वर्षापासून वारी कालावधीत दर्शनासाठी येत असणाऱ्या एका भाविकांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेतली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी श्री विठ्ठलाचे व्हीआयपी दर्शन बंद करून त्याची कार्यक्षमपणे अंमलबजावणी केलेली आहे. त्यामुळे दर्शन रांगेत श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी कमी वेळ लागत असल्याचे अनेक दर्शन घेऊन आलेल्या भाविकांकडून सांगितले जात आहेत.भाविक वारकरी यांची कोणत्याही प्रकारची गैर सोय होऊ नये यासाठीच शासन, प्रशासन सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. व भाविकांच्या चेहऱ्यावर येथील सर्व सोयीसुविधा पाहून तसेच दर्शन वेळेत होऊन समाधानाचे भाव उमटावेत यासाठीच प्रशासन कटिबद्ध आहे.